महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग

**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,**

आनंद ऋषीजी मार्ग, दिंडोरी रोड, नाशिक - 422 004

☎ (0253) अधीक्षक अभियंता- 2530621 व्यावसायीक परीक्षा शाखा-2532879, फॅक्स-2530251/206

ई-मेल- metanashik@gmail.com वेबसाईट- www.metanasik.org

# परिपत्रक

**विषय:-** **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) पदाकरीता - सन 2019 मध्ये घेतली जाणारी ऑनलाईन व्यावसायिक परीक्षा.**
**(सदरची व्यावसायिक परीक्षा ही केवळ शासकीय / निमशासकिय सेवेत असणा-या परिक्षार्थ्यांसाठीच आहे याची नोंद घ्यावी.)**

१) जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागातील स्थापत्य/ यांत्रिकी / विद्युत शाखेतील सहाय्यक अभियंता श्रेणी-2 / शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता यांचेकरीता महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक मार्फत जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक : Exam.1082 / 445/ E (13), दिनांक 18/1/1983 मधील तरतुदीनुसार व शासनाने विहित केलेल्या प्रचलित अभ्यासक्रमानुसार **दिनांक 04/11/2019 ते 06/11/2019 या कालावधीत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) पदाकरीता** व्यावसायीक परीक्षा घेण्यात येणार आहे. सदर परीक्षा महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियमावली (1984,आवृत्ती सहावी ) परिशिष्ट एक, परिच्छेद- 54 मधील उप विभाग- 3 व वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार घेण्यात येतील. **सदर परिपत्रक, प्रवेश अर्जासंबंधीच्या सूचना व प्रवेश अर्ज नमुना इ.माहिती प्रबोधिनीच्या www.metanasik.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.**

२) जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता श्रेणी-2 / शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता यांचेकरीता प्रचलित शासकीय नियमानुसार ही व्यावसायिक परीक्षा घेणे प्रस्तावित आहे. त्याचबरोबर शासनाचे इतर विभाग उदा. जिल्हा परिषद / महानगरपालिका व इतर महामंडळातील कनिष्ठ अभियंता पदावरील अभियंत्यांनाही या व्यावसायिक परीक्षेला बसता येईल. **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/तत्सम प्रवर्गातील पदावरील कर्मचा-यांकरीता सदरची व्यावसायिक परीक्षा ही अर्हताकारी परीक्षा असल्याने स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/तत्सम पदावरील कर्मचारी कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षेस बसण्यास, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसयुटी 1011/प्र.क्र.287/ आस्था. 2 दिनांक 07/03/2012 नुसार पात्र असल्याबद्दलची खात्री नियंत्रक अधिकारी यांनी विशेष दक्षतापूर्वक करावयाची असून त्या बाबतची संपूर्ण जबाबदारी नियंत्रक अधिकारी यांची राहील याची जाणीवपूर्वक नोंद घ्यावी. तसेच परिपत्रकानुसार पात्र नसलेल्या परीक्षार्थीचा प्रवेश अर्ज सादर करण्यात आल्यास परिपत्रकाचे पालन न केल्यास शासनास अवगत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**
परीक्षार्थीनी महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक कडे स्वतंत्ररीत्या कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करु नये. नियंत्रक अधिका-यांमार्फत केलेला पत्रव्यवहारच ग्राह्य धरला जाईल.

३) यांत्रिकी व विद्युत शाखेमधील कनिष्ठ अभियंता पदाची व्यावसायिक परीक्षा फक्त नाशिक या केंद्रावरच घेण्यात येईल. स्थापत्य शाखे मधील कनिष्ठ अभियंता पदाची व्यावसायिक परीक्षा ५ विविध केंद्रावर घेण्याचे नियोजितआहे.

४) इच्छुक उमेदवारांना प्रवेशासाठी अर्ज सुचना व प्रवेश पत्र www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर संकेतस्थळावर परिक्षार्थीना स्वत:चे Profile तयार करुन सदर परिक्षेसाठी Online अर्ज करावा. या संकेतस्थळावर जर आधिच स्वत:ची Profile असेल तर नव्याने Profile तयार करावयाची आवश्यकता नाही. आधीच्या Profile चा वापर करुन online अर्ज करणे शक्य आहे

५) Online अर्ज भरल्यानंतर online अर्जाची Printout काढावी. त्यावर नियंत्रक अधिका-यांची स्वाक्षरी व शिक्का घेऊन नियंत्रक अधिका-यामार्फत सदर अर्ज मेटा कार्यालयास Hard copy पाठवावी. नियंत्रक अधिका-यांच्या शिफारशी शिवाय कुठलाही अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी. व्यावसायिक परीक्षेसाठी Online अर्जाची Hard copy पाठविणा-या परिक्षार्थ्यांचीच यादी वेब साईटवर लावण्यात येईल.

६) दिनांक 26/09/2019 नंतर आलेले तसेच अपूर्ण अथवा चुकीची माहिती / त्रुटी असलेले किंवा नियंत्रक अधिकारी (अधीक्षक अभियंता / अ.अ.व प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हाधिकारी / महानगरपालिका. / विभागीय महसुल आयुक्त) यांचेमार्फत न आलेले अर्ज नामंजूर करुन दप्तरी दाखल केले जातील याची नोंद घ्यावी. नियंत्रक अधिका-यांनी अर्ज पाठविताना अर्जदाराने घेतलेला ऐच्छिक विषय त्यांचा कामाशी संबंधित आहे याची खात्री करुनच शिफारस करावी.तसेच सेवा प्रवेश अर्जासोबत शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडाव्यात. जर एखाद्या कार्यालयाकडून अर्ज पाठविण्यास उशीर झाला व परीक्षार्थीना प्रवेश नाकारण्यात आला तर त्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.

७) नियंत्रक अधिकारी (अधीक्षक अभियंता / अ.अ.व प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हाधिकारी / महानगर पालिका / विभागीय महसुल आयुक्त) यांना विनंती करण्यात येते की, या परिपत्रकाचा मजकूर परिपत्रक मिळाल्यापासून एक आठवडयाच्या आत परीक्षार्थींच्या निदर्शनास आणावा. विहित नमुना प्रवेश व सूचना पत्र यांच्या झेरॉक्स प्रती काढून त्या इच्छूक परीक्षार्थींना उपलब्ध करुन द्याव्यात. परीक्षार्थींनी पूर्ण भरुन दिलेला प्रवेश अर्ज व्यवस्थीत तपासून त्यात त्रुटी रहाणार नाहीत याची खात्री करावी नियंत्रक अधिकारी (अधीक्षक अभियंता) यापेक्षा खालील स्तरावरील असेल परंतु प्राधिकृत करण्यात आला असेल तर ते नियंत्रक अधिकारी म्हणून शिफारस करु शकतील. परंतू त्यांनी प्राधिकृत अधिकारी आहेत अशा आदेशाची प्रत सोबत पाठवावी. त्रुटी असलेले प्रवेश अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील व ते त्रुटींची पूर्तता करण्याकरिता **परत पाठविण्यात** येणार नाहीत, याची कृपया नोंद घेणे आवश्यक आहे..

सहपत्र :

1) **सुचना पत्र**
2) परिक्षेचे वेळापत्रक

जा.क्र :- मअप्रप्र / क.अ./ व्या.प/ 41 / 2019
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,नाशिक
दि. 17/07/2019.

अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

1) मा.सचिव, जलसंपदा (व्यवस्थापन व लाक्षेवि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई 400032 यांना माहितीसाठी सविनय सादर.
2) मा.सचिव,(बाधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई 400032 यांना महितीसाठी सविनय सादर.
3) मा.महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना सविनय सादर.
4) मा. कार्यकारी संचालक ---------------------------------------------------- यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी माहितीसाठी व योग्य कार्यवाहीस्तव सविनय सादर.
   1. मुख्यअभियंता,जलसंपदाविभाग/सा.बां.विभाग,-------------------------------------------------------
   2. आयुक्त-(विभागीय महसूल विभाग/ महानगरपालीका) ---------------------------------------------
   ----------------------------------------------------------------------------------------------------------
5) अधीक्षक अभियंता / अ.अ.व प्रशासक, (जलसंपदा विभाग / सा.बां. विभाग),-----------------------------------
6) मुख्य कार्यकारी अधिकारी / जिल्हाधिकारी ------------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------------------------------------------------

# सूचना पत्रक

## महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक 422004

## सहा. अभियंता श्रेणी-2/शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी /विद्युत) यांची व्यावसायीक परीक्षा सन -2019

### प्रवेश अर्ज भरण्यासाठी सूचना

1) प्रवेश अर्ज भरण्यास सुरवात करण्यापूर्वी खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.

2) सुचने सोबत जोडलेल्या याच वर्षाच्या विहीत नमुन्यात अर्ज करावा. अपूर्ण माहिती भरलेला,असत्य किंवा चुकिची माहिती दिलेला अर्ज नामंजूर करण्यात येईल.योग्य नियंत्रक अधिकारी यांचे मार्फतच अर्ज पाठवावा. योग्य नियंत्रक अधिकारी यांच्या मार्फत जे अर्ज येणार नाहीत ते नामंजूर होतील अपूर्ण अर्ज पूर्ततेसाठी परत पाठविला जाणार नाही व असे अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. तेव्हा सबंधीत कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता/ नियंत्रक अधिकारी यांनी प्रवेश अर्ज तपशिलवार तपासून उणीवा राहणार नाहीत याची पूर्ण खात्री करुनच प्रवेश अर्ज पुढे पाठवावेत.अपूर्ण अर्ज विना पत्रव्यवहार दप्तरी दाखल झाले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित परीक्षार्थीची व त्यांचे नियंत्रक अधिका-यांची राहील.

3) विहित नमुन्यातील मूळ अर्ज एकाच प्रतीत पाठवावयाचा आहे.

4) अर्ज स्विकारण्यासाठी अखेरचा दिनांक परिपत्रकात दिलेला आहे. परीक्षार्थीने आपलाअर्ज सर्व त-हेने पूर्ण करुन मुदतीचे आत प्रबोधिनीत पोहोंचतील अशी काळजी घ्यावी. उशिरा पोहोचणारे अर्ज. कोणत्याही कारणास्तव स्विकारले जाणार नाहीत.

5) परीक्षार्थी परीक्षेस बसण्यास पात्र ठरण्यासाठी त्यांनी खालील प्रमाणे सेवा काळ पूर्ण केला असण्याची आवश्यकता आहे

| | | |
|---|---|---|
| अ) | कनिष्ठ अभियंता/शाखाअभियंता/सहाय्यक अभियंता-श्रेणी-2 (कनिष्ठ अभियंता संवर्गातील सेवासहीत) | 1 वर्ष- पूर्ण विनाखंड |
| ब) | उपअवेक्षक/सर्वेक्षक/ समावेशनाने झालेले स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | 4 वर्षे पूर्ण (तांत्रिक सहा./ उपअवेक्षक/ सर्वेक्षक/ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील सेवा धरुन.) |
| क) | तांत्रिक सहाय्यक | 10 वर्षे पूर्ण (तांत्रिक सहाय्यक या पदावर तथापी उपअवेक्षक या पदाची पात्रता परीक्षा उत्तीर्ण ) |
| ड) | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 4 वर्षे पुर्ण (म.अ.प्र.प्र. नाशिक मार्फत घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाची विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक) |

**टीप:-1) प्रचलित नियमामध्ये काही बदल झाल्यास तसेच ऐनवेळी येणा-या शासन निर्देशानुसार सुधारीत नियमाप्रमाणे परीक्षार्थींना प्रवेश दिला जाईल.**

2) सेवाकाल ठरविण्याकरीता परीक्षेच्या पहील्या दिवसापर्यंत सेवाकाल पूर्ण आहे या (प्रमाणे आकडेमोड, करावी.)

6) अभियांत्रिकी क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता असूनही (उदा.अभियांत्रिकी पदविका इ.) इतर पदांवरील व्यक्तींनी (उदा.आरेखक,अमीन, मुकादम) या परीक्षेसाठी अर्ज करु नये. तसेच शेतकी क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता असणा-या अभियंत्यांनी (सहाय्यक अभियंता / कनिष्ठ अभियंता इ.) अर्ज करु नये. या परीक्षेस बसण्याची **त्यांना परवानगी दिली जाणार नाही.**

7) तांत्रिक पदवी अथवा पदविका किंवा असलेली तांत्रिक शैक्षणिक अर्हता नमूद करावी व प्रमाण पत्रांच्या प्रती सोबत जोडाव्यात.

8) सदर परीक्षेची केंद्रे आणि त्या त्या केंद्रासाठी ठरविलेले जिल्हे व संकेतांक खालील प्रमाणे आहेत. त्याप्रमाणे 2 मध्ये भरावे. जर एखाद्या परीक्षा केंद्रामधील परीक्षार्थीची संख्या कमी असेल तर म.अ.प्र.प्रबोधिनीच्या सोयी नुसार सदरचे परीक्षा केंद्रातील परीक्षार्थी नजिकच्या परीक्षा केंद्रास जोडले जातील.

| अभियांत्रिकी विभाग | परिक्षा केंद्र | केंद्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| स्थापत्य | 301 ठाणे | ठाणे, मुंबई शहर,मुंबई उपनगर,रायगड रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| स्थापत्य | 303 अकोला | अकोला, वर्धा, बुलढाणा, वाशिम, नांदेड, परभणी, हिंगोली |
| स्थापत्य | 304 अमरावती | अमरावती, नागपूर, यवतमाळ, |
| स्थापत्य | 305 चंद्रपूर | चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, |
| स्थापत्य | 307 सोलापूर | उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, बीड, जालना |
| स्थापत्य | 310 सातारा | सातारा, कोल्हापूर, सांगली |
| स्थापत्य | 311अहमदनगर | अहमदनगर, औरंगाबाद, पुणे, |
| यांत्रिकी | 313 नाशिक | महाराष्ट्रातील सर्व जिल्हे |
| विद्युत | 314 नाशिक | महाराष्ट्रातील सर्व जिल्हे |
| स्थापत्य | 315 नाशिक | नाशिक, धुळे, जळगांव, नंदुरबार |

माहिती सेवा पुस्तकाशी सुसंगत असावी. प्रवेशासाठी ही माहिती अत्यंत आवश्यक आहे तसेच या बाबतीत अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

10) उमेदवार पहिल्यांदा परीक्षेला बसत असल्यास योग्य चौकटीमध्ये निरंक असे लिहावे.दुस-यांदा बसत असल्यास तेथे एक असे लिहावे.अशा पध्दतीत तीन चार असे पूर्वी घेतलेल्या संधीनुसार लिहावे.पूर्वी परीक्षेला बसण्यासाठी अर्ज करुन,आसन क्रमांक मिळाल्यानंतर देखील परीक्षेला अनुपस्थित राहिल्यास परीक्षेची संधी घेतली आहे असे समजण्यात येते.

11) यापूर्वी मिळालेल्या संधीत उमेदवार 3 वेळा नापास झाला असल्यास यावेळी परीक्षेला बसण्यासाठी नियंत्रक प्राधिकारी यांचेकडून खास मंजूरी घेण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र सा.बां.नियमपुस्तिका (1984,सहावी आवृत्ती ) मधील परिशिष्ट एक,उपविभाग-3 मधील नियम क्रमांक 4 व 12 वाचा) या नियमानुसार योग्य प्रमाणपत्र भरावे व आदेशाची प्रत जोडावी. हे प्रमाणपत्र सहाय्यक अभियंता श्रेणी 2, शाखा अभियता, कनिष्ठ अभियंता यांचेसाठी आवश्यक आहे.

12) परीक्षार्थी शासनाच्या जलसंपदा/ सार्वजनिक बांधकाम विभागा व्यतिरिक्त इतर अशासकीय / निमशासकीय अथवा महामंडळे खेरीज इतर विभागाचे शासकीय कर्मचारी असल्यास अगर कोणत्याही जिल्हा परिषदा / संघटना / महामंडळे यातील कर्मचारी असल्यास परीक्षा शुल्क म्हणून रु.3000/- ( रुपये तीन हजार मात्र ) भरावे लागतील. **परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया, मेरी शाखा, नाशिक या बचत खाते क्रं. 10934419845 वर Assistant Director (Adm.) Maharashtra Engineering Training Academy, Nashik-04 या खात्यावर जमा करावेत व त्याची Original Counter Slip प्रवेश अर्जा सोबत दोन प्रतित जोडण्यात यावी. व Counter slip च्या पाठीमागे परीक्षार्थींनी स्वत:चे पूर्ण नांव, भ्रमणध्वनी क्र. व पत्ता लिहावा. सदरचे परिक्षा शुल्क कोठल्याही स्थितीत परत केले जाणार नाही.** जलसंपदा विभाग/सार्व.बांध. विभागातील शासकीय कर्मचारी असल्यास त्यांना परीक्षा शुल्क देण्याची आवश्यकता नाही असे स्पष्ट नमूद करावे.

13) परीक्षार्थींना वरील सर्व माहिती ही बिनचूक व खरी द्यावी लागेल याची नोंद घ्यावी. नंतर जर असे आढळून आले की, दिलेली माहिती ही खोटी अगर दिशाभूल करणारी असेल तर त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई होऊन परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे मिळालेले फायदे मिळणार नाहीत.

14) परीक्षा केंद्रावर वैयक्तिक वा सांघिक गडबड करणे / गोंधळ घालणे व प्रत्यक्ष अप्रत्यक्ष इतरांना परीक्षेस बसण्यास हरकत घेणे, कॉपी करणे इ. कृत्य शिस्तभंगाचे समजले जाईल. व दोषी परीक्षार्थीवर कार्यवाही करण्यात येईल. कॉपी करणा-यास पुढील पेपर देता येणार नाहीत.

15) परीक्षार्थीने त्याचा व नियंत्रक अधिका-याचा पत्ता **मराठी किंवा इंग्रजी** मध्ये अर्जात दिलेल्या रकान्यातच भरावा.

16) प्रबोधिनीने जाहीर केलेला निकाल हा अंतीम राहणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीमध्ये फेरतपासणी / पुनर्मुल्यांकन याची तरतूद नसल्याने निकालाची फेरतपासणी केली जाणार नाही. तसेच उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन केले जात नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

17) प्रवेश अर्जावर उजव्या बाजूचे वरचे कोप-यावर प्रत्येक परीक्षार्थीने स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवणे अनिवार्य आहे. तसेच सदर फोटो त्याचे कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांचेकडून साक्षांकित करुन घेणे आवश्यक आहे. साक्षांकित करणा-या अधिका-याची सही व शिक्का फोटोवरच असणे आवश्यक आहे.

18) ऑनलाईन प्रवेशपत्रावर दर्शविलेल्या जागी परीक्षार्थीने प्रवेश अर्जावर लावलेल्या पासपोर्ट आकाराच्या फोटोची दुसरी प्रत चिकटवावयाची आहे व त्यावर त्यांचे कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांचेकडून साक्षांकित करुन घेऊन ते अर्जासोबत पाठवावयाचे आहे. परीक्षेसाठी परीक्षार्थीची यादी संकेतस्तळावर परीक्षेपूर्वी प्रसिध्द करण्यात येईल. प्रवेशपत्र परीक्षार्थीच्या संबंधित परीक्षा समन्वय अधिका-याकडे पाठविण्यात येतील. परीक्षार्थीनी आपल्या समन्वय / नियंत्रक अधिका-यांकडून प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे.

---

## पृष्ठांकन, प्रमाणपत्रे, इत्यादी

(परीक्षार्थीच्या संबंधीत कार्यालयाने भरावयाचे)

**क्षेत्रीय कार्यालयाकरीता**

**जावक** क्रमांक -------------------------------------------

(कार्यकारी अभियंता किंवा तत्सम अधिकारी)

दिनांक:

मा.अधीक्षक अभियंता / अ.अ. व प्रशासक / आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी

-----------------------------------------यांचे कार्यालय.

---------------------------------------------------------- यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

1) सदर सहाय्यक अभियंता श्रेणी 2 / शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता / सर्वेक्षक / उपअवेक्षक / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / तांत्रिक सहाय्यक पुरेसे सक्षम आहेत व त्यांचे अखत्यारीतील कर्मचारी व मजूरांवर त्यांचे पुरेसे नियंत्रण असते / आहे. त्यांनी घेतलेला एच्छिक विषय ( ) योग्य आहे.

सदर परीक्षेच्या सुरुवातीच्या दिवसा पर्यंत त्यांनी --------- वर्षे सेवा पूर्ण केली आहे. आतापर्यंत त्यांनी परीक्षेची ------- संधी घेतली आहेत. अर्जात भरलेल्या सर्व बाबींची पडताळणी त्यांच्या सेवापुस्तका बरोबर केली आहे.

स्थळ :-

दिनांक :-

माहिती पडताळली

क्षेत्रीय कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी व

कार्यकारी अभियंता कार्यालयाचा शिक्का

प्रथम लिपीक -

**संबंधित परीक्षार्थीस परीक्षेस बसू देण्याबद्दल अनुमती देऊन आवश्यक त्या प्रमाणपत्रान्वये शिफारस करण्यात येत आहे.**

**अ) प्रमाणपत्र 1 (कनिष्ठ अभियंतासाठी)**

**(परीक्षार्थीने प्रमाणपत्रामधील क्रमांक 1, 2 अ किंवा 2 ब यापैकी योग्य असेल तो एकच पर्याय ठेवावा)**

प्रमाणित करण्यात येते की परीक्षार्थी,

1. श्री/श्रीमती/कुमारी ---------------------------------------------------- यांची 1) प्रथम नेमणूक **कनिष्ठ अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी**-2 या पदावर झाली असून त्यांचे सध्याचे पद ---------------------- आहे व या पदावरील त्यांचा किमान सेवा कालावधी एक वर्षापेक्षा जास्त असलेने ते कनिष्ठ अभियंता पदाच्या व्यावसायिक परीक्षेस बसण्यास पात्र आहेत **अथवा** 2) त्यांना महाराष्ट्र सा.बां.नियम पुस्तिका (1984,सहावी आवृत्ती ) परिशिष्ठ 1, उपविभाग 3 मधील नियम क्रं 4 व 12 च्या तरतुदीनुसार व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यास निर्धारीत संधीपेक्षा पुढे वाढीव संधीस (.................... संधी ) या कार्यालयाचा **आदेश क्रमांक** दिनांक प्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक : नियंत्रक अधिकारी यांची स्वाक्षरी व शिक्का

(अधीक्षक अभियंता / अ.अ.व प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी इ.)

**टीप:- वाढीव संधी आदेशाची प्रत महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीस सादर करणे आवश्यक आहे.**

---

**ब) प्रमाणपत्र 2**

**(सर्वेक्षक / उपअवेक्षक /स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गधारी बाबतीत कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षेस बसण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र) (समावेशनाने नियुक्त स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांकरिता)**

2. (अ) **प्रमाणित** करण्यांत येते की, श्री. / श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------------------ पदनाम स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / सर्वेक्षक / उपअवेक्षक यांनी परीक्षेच्या पहिल्या दिवसापर्यंत त्यांची तांत्रिक सहाय्यक/ कार्यनिरीक्षक प्रकारची सेवा धरुन ------------- वर्षे सेवा पूर्ण केली आहे. म्हणून ते कनिष्ठ अभियंत्यांचे संवर्गामध्ये प्रवेश करण्यासाठीच्या पात्रतेसाठीच्या व्यावसायिक परीक्षेस बसण्यास शासन निर्णय पाटबंधारे विभाग सीडीएस् 2866/40401 (इ-2), दिनांक 9/6/67 अन्वये पात्र आहेत.

**( सरळसेवेने / नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या स्थापत्य अभियंता सहायकांकरिता )**

2 (ब) **प्रमाणित** करण्यांत येते की श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------------ हे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावर सरळसेवेने (नामनिर्देशनाने) नियुक्त झालेले आहेत. त्यांनी शासन अधिसूचना (सार्वजनिक बांधकाम विभाग) दिनांक 18/6/1998 किंवा महाराष्ट्र शासन परिपत्रक अधिसूचना (पाटबंधारे विभाग ) दिनांक 26/2/2002 मधील नियम (5) नुसार तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्रमांक एसयुटी 1011/प्र.क्र.287/आस्था.2, दिनांक 7/3/2012 अन्वये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर 4 वर्षे सेवा पुर्ण केली आहे आणि महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक मार्फत घेण्यात येणारी विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली आहे. [सूचना पत्रकातील सूचने नुसार खातरजमा करावी ]

स्थळ :

दिनांक : नियंत्रक अधिकारी यांची स्वाक्षरी व शिक्का

(अधीक्षक अभियंता /अ.अ.व प्रशासक / मुख्य कार्यकारी अधिकारी इ.)

---

**क) प्रमाणपत्र 3**

**(तांत्रिक सहाय्यकाचे बाबतीत कनिष्ठ अभियंता पदाच्या व्यावसायिक परीक्षेस बसण्यास आवश्यक प्रमाणपत्र)**

प्रमाणित करण्यांत येते की, श्री./श्रीमती/कुमारी ................................ ............... पदनाम .................... यांनी परीक्षेचे पहिल्या दिवसापर्यंत त्यांची तांत्रिक सहाय्यक / कार्यनिरीक्षक या पदावर ................ वर्षाची सेवा पूर्ण केली आहे. त्याच प्रमाणे ते उपअवेक्षकाची व्यावसायिक परीक्षा किंवा तत्सम अन्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असून ते शासन निर्णय क्रमांक इएक्सएम 1084(286) आ.प्रशि., दिनांक 7/10/1986 अन्वये व्यावसायिक परीक्षेस बसण्यास पात्र आहेत. (सूचना पत्रकातील सूचना पहावी )

स्थळ :

दिनांक : नियंत्रक अधिकारी यांची स्वाक्षरी व शिक्का

(अधीक्षक अभियंता/अ.अ.व प्रशासक/मुख्य कार्यकारी अधिकारी इ.)

## व्यावसायिक परीक्षेचे वेळापत्रक

| वार / दिनांक | कालावधी | विषय | ऑनलाईन |
|---|---|---|---|
| सोमवार 04/11/2019 | 09.00 ते 10.30 | सामान्य अभियांत्रिकी (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | ऑनलाईन |
| | 11.30 ते 13.00 | ऐच्छिक विषय (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | ऑनलाईन |
| मंगळवार 05/11/2019 | 09.00 ते 10.30 | लेखा नियम (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | ऑनलाईन |
| बुधवार 06/11/2019 | 08.00 ते 12.00 | प्रात्यक्षिक (स्थापत्य / यांत्रिकी) | लेखी/ तोंडी |
| | 14.00 ते 18.00 | चित्ररेखन (स्थापत्य / विद्युत) | लेखी |

**विशेष सूचना:-**

प्रात्यक्षिक परीक्षेचा कार्यक्रम दिनांक 06/11/2019 रोजी त्या त्या केंद्रावर समन्वय अधिकारी जाहिर करतील.